C.No- 355

ॐ

[illegible] मल्लप्पा बसप्पा वारद यांच्या उदार आश्रयाखालीं

[illegible] होणारी वीरशैवलिंगिब्राह्मणधर्माबद्दल माहिती

बसवेश्वराच्या पूर्वींच्या व नंतरच्या

वीरशैवांची स्थिति.

हा लेख,

गोकाककर रा. रा. मल्लिकार्जुन मलकप्पा कल्याण-
शेट्टी; बी. ए. सब्‌रजिष्टर.

यांनीं

[illegible] येथील पहिल्या श्रीमद्वीरशैवमहासभेच्या कार्यकारी
मंडळीकडून आलेल्या सूचनेवरून लिहिला

तो

[illegible]णपूर मठाध्यक्ष मल्लिकार्जुन शास्त्री

यांनीं

सोलापूर येथें

[illegible]गप्पा देवमाले यांच्या वीरशैवविभूषण
[illegible]र छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केला.

आवृत्ति १ ली–प्रती १०००

शके १८३० सन १९०८

हें पुस्तक प्रसिद्धिकर्त्यानें सर्व हक्कांसह रा. सा. मल्लप्पा
बसप्पा वारद यांस अर्पण केला आहे.

किंमत [illegible].

8254
15D4

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

Q234 3584
155 D4
Mallikarjuna Malkappa
Veershalvanchi Stiti.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

Q234 SHRI JAGADGURU VISHWARADHYA JNANAMANDIR 3584
155D4 (LIBRARY)
JANGAMAWADIMATH, VARANASI

Please return this volume on or before the date last stamped
Overdue volume will be charged 1/- per day.

1ρ 0-4-0

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

Q234 3584
155 D4
Mallikarjuna Malkappa
Veershalvanchi Stiti.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रावसाहेब मल्लप्पा बसप्पा वारद यांच्या उदार आश्रयाखालीं
प्रसिद्ध होणारी वीरशैवलिंगिब्राह्मणधर्माबद्दल माहिती.

बसवेश्वराच्या पूर्वींच्या व नंतरच्या

वीरशैवांची स्थिति.

आराध्य सिद्धा... ज्ञानमंदिरम् ... जंगमवाडी मठ, काशी

हा लेख,

गोकाककर रा. रा. मल्लिकार्जुन मलकप्पा कल्याण-
शेट्टी; बी. ए. सबुरजिष्टर.

यांनीं

धारवाड येथील पहिल्या श्रीमद्वीरशैवमहासभेच्या कार्यकारी
मंडळीकडून आलेल्या सूचनेवरून लिहिला

तो

वे. मू. मणूर मठाध्यक्ष मल्लिकार्जुन शास्त्री

यांनीं

सोलापूर येथें

मडिवाळप्पा संगप्पा देवमाले यांच्या वीरशैवविभूषण
व श्रीसिद्धेश्वर छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केला.

आवृत्ति १ ली—प्रती १०००

शके १८३० सन १९०८

हें पुस्तक प्रसिद्धिकर्त्यानें सर्व हक्कांसह रा. सा. मल्लप्पा
बसप्पा वारद यांस अर्पण केला आहे.

किंमत ८४.

10 0 — 4 — 0

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

Q234
155D4

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No. 3584

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हा लेख,

लेखकानें गोकाककर कै. रा. चनबसाप्पा अण्णा

धारवाड; डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर

साहेब बहादूर

यांस

स्यांच्या अंगीं वसत असलेल्या वीरशैव-

विद्याभिवृद्धीच्या उत्कट इच्छेच्या

स्मरणार्थ

अर्पण केला आहे.

लेखक,

मल्लिकार्जुन मलकप्पा कल्याणशेट्टी,

बी. ए. गोकाक.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

बसवेश्वराच्या पूर्वींच्या व नंतरच्या

वीरशैवांची स्थिति.

" नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण "

प्रस्तुत लेखाचा मुख्य उद्देश.

एका कवीची वरील उक्ती अगदीं सार्थ आहे. चक्राच्या परिघाचें प्रत्येक टोंक ज्या प्रमाणें अनुक्रमें उच्च नीच अवस्था पावतें त्याच प्रमाणें कोणताही देश, कोणतेंही राष्ट्र, कोणताही धर्म, अथवा कोणतेंही मत एका कालीं अति उच्च शिखराला जाऊन पोंचलेलें दिसलें तरी तें दुसऱ्या कालीं अति नीच तळाला जाऊन पोंचलेलें आढळतें. याच नियमाला अनुसरून आमच्या या वीरशैव मताची सध्यां अगदीं हीन स्थिति झालेली आहे. त्याला सध्यां इतकी निकृष्टावस्था प्राप्त झालेली आहे कीं त्यास कोणी धनी ना गोसावी! हवें त्यानें त्याविषयीं वाटेल तशी बल्गना करावी! जो जो जितकी जितकी अधिक बल्गना करील तो तो तितका तितका जाडा पंडित! व जाडा शोधक! इतर मतांविषयीं कोणास कांहीं लिहिणें किंवा बोलणें झाल्यास कांहीं तरी शोध करून अंमळ जपून लेखणी अथवा तोंड चालवावें लागतें. पण आमचें वीरशैवमत ह्मटलें कीं काय पाहिजे तें लिहावें! किंवा बोलावें! कांहीं शोध करायाला नको कीं कांहीं माहिती विचारायाला नको. जें लिहावें किंवा बोलावें तें सप्रमाण! व सत्य! बरें आमच्या समाजाच्या मंडळीला यांतलें कांहीं टोंचेल ह्मणावें तर त्याची

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वार्ताही नको! तुह्मी त्यांस पाहिजे तितकें हिणवा, नाहीं नाहीं तीं नांवें ठेवा ते तिकडे पाहणारहि नाहींत! कांहीं लोकांच्या तोंडून असे निरर्गळ प्रलाप ऐकू येतात कीं बसवेश्वरानेंच आमचें मत स्थापन केलें! बसवपुराण हाच आमच्या मतास मुख्य आधारग्रंथ आहे! बसवेश्वराच्या पूर्वीं आमच्या मताचें नांवही नव्हतें! बसवेश्वरापासून काय तें आमचें मत वाढलें! व आमच्या मतांत बसवपुराणाखेरीज इतर दुसरे चांगले ग्रंथहि नाहींत! या अशा निरर्थक प्रलापानें आमच्या मताच्या खऱ्या माहितीचें अज्ञान मात्र वाढणार आहे! याला आळा घालण्याकरितां आपल्या मताची खरी माहिती मिळवून प्रसिद्ध करणें अत्यावश्यक आहे, या करितां अत्यंत विश्वसनीय व सध्यांच्या काळीं इतिहासज्ञानाला मुख्य साधन असे जे ताम्रपट व शिलालेख यांचें एका पाश्चिमात्य पंडितानें इंग्रजींत भाषांतर केलेलें आहे. त्याचा आधार घेऊन त्यांत दिलेल्या बसवेश्वराच्या पूर्वींच्या आपल्या मताच्या अस्तित्वाची स्पष्ट व विश्वसनीय माहिती देऊन सध्यां आपल्या मतांविषयींची झालेली गैरसमजूत दूर करून त्याचें यथार्थ ज्ञान अल्पसें तरी करून द्यावें हा या प्रस्तुतच्या माझ्या लेखाचा मुख्य उद्देश आहे.

कोणत्या अभिप्रायाचें खंडन करण्यास हा लेख लिहिण्यांत आला.

आमच्या ह्या वीरशैव मताविषयीं इतर मताभिमानी लोकांमध्यें फार चमत्कारिक मत रूढ झालेलें आहे. आमच्या ह्या मताची उत्पत्ति अगदीं थोड्या काळापूर्वींची ह्मणजे इ. स. ११६० च्या सुमारची हा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

णजे बसवेश्वराच्या काळापासूनची असा यांचा दृढ ग्रह झालेला दिसतो. हा असा दृढ ग्रह होण्यास कोणतीं कारणें असावींत तें मला स्पष्ट दिसत नाहीं. याला आमच्या लोकांचें आपल्या पूर्वजांच्या माहितीविषयीं पूर्ण अज्ञान व त्यांच्याविषयींची अत्यंत अभिमानशून्यता हें तर कारण आहेच तथापि आमच्या धर्मसंबंधीं पुस्तकांपैकीं बसवपुराण, चन्नबसवपुराण वगैरे अलीकडे अलीकडे प्रख्यात झालेलीं पुस्तकें हींच विशेषतः वाचण्यांत आल्यामुळें बसवेश्वर व चन्नबसवेश्वर हेच मतसंस्थापक असावेत अशी कल्पना करण्यास त्यांस जागा झाली असावी असें वांटतें. तरी त्यांनीं तेच ग्रंथ थोडेसे मननपूर्वक वाचिले असते तर ते असा पोकळ तर्क करण्यास धजावले नसते. सरोवराचा अंत किंवा त्यांतील सरोजांचें मूळ कांठाकांठांनीं चालून लागत नसतो. त्याला बरेंच आंत जाऊन धैर्य व बल यांसहित खोल डुबावें लागतें! नाहीं तर त्याच्या कांठा कांठाशीं असलेला चिखलच हातीं लागावयाचा! तद्वतच यांची स्थिति झालेली आहे कारण त्याच ग्रंथांमध्यें हें वीरशैव मत अनादिकालीन आहे व बसवेश्वराच्या पूर्वीं बसवेश्वरासारखे किंबहुना त्याहूनाहि अधिक भक्तश्रेष्ठ व वीरशैवमतोद्धारक होऊन गेले आहेत असें वर्णन ठिकठिकाणीं आहे. असें असून त्यांच पुनः ह्मणणें आहे कीं, वीरशैवमत अनादिकालापासून चालत आलेलें असलें तरी हे लिंगायत लोक बसवेश्वराच्या अगोदर क्वचित् ठिकाणीं आढळत होते व त्यांचें तेज पूर्वीं थोडें देखील नव्हतें व इतर मतांतील लोकांना वीरशैवमतांत आणावयाचा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

प्रकार केवळ बसवेश्वरानेंच आरंभिला व बसवेश्वराचे वेळेस ते अतिशय वाढले. आणि त्या दिवसापासून हें मत वाढत येऊन प्रस्तुत त्याचा इतका विस्तार झालेला दिसतो! त्याच्या अगोदर हे लोक क्वचित् काचित् ठिकाणीं होते. आणि या मताचारामध्यें बसवेश्वरानें गुणदोष पाहून सुधारणा केली याप्रमाणें आपापल्या कल्पनेला येईल तसें कांहीं तरी इतर मताचे लोक ह्मणतात. या सर्व आक्षेपांस माझें ह्मणणें असें आहे कीं, — या माझ्या ह्मणण्याच्या पुष्टीकरणार्थ साधार लेख पुढें आहेत — बसवेश्वरानें वीरशैवमतांत कांहींही अधिक भर घातली नाहीं. थोडे फार जातीचे लोक कदाचित् त्या वेळीं वीरशैवमतानुयायी झाले होते परंतु ते शेंकडा २।३ प्रमाणानें असावेत. अर्थात्च त्यांचा विशेष परिणाम या मतावर झाला नसावा. धर्माचारांत त्यानें कांहींहि कमजास्त फेरफार केला नाहीं. व या मताची कोणत्याही रीतीनें सुधारणा केली नाहीं असें असतां बसवेश्वराचें नांव इतकें वाढावयास कारण काय? अशी जर कोणी शंका घेईल तर त्याचे पूर्वीं कित्येक वर्षे वीरशैवपंथांत नवीन आलेल्या अन्यमतवादी लोकांचा मूळ वीरशैवमतवाद्यांकडून तिरस्कार होत असे त्यांनीं एकमतानें बसवेश्वराच्या वेळीं आपणांस वीरशैव असें मानिलें जावें ह्मणून त्याच्या प्रयत्नांस साहाय्य करून व त्यास पुढें करून ते त्याचें स्तोत्र करूं लागले. त्याच्या मुळें जंगमास थोर आश्रय मिळाला. त्याच्यां अलौकिक दातृत्वानें ते जंगम तुष्ट झाले. त्याच्या सारख्या त्या जंगम

या लेखापासून निघणारा सारांश.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

भक्तीनें दुसऱ्यांस प्रोत्साहन देऊन त्यांसही सन्मार्गास ल-वावें ह्मणून त्या वीरशैवांनीं त्यास भक्താग्रगण्य केलें हेंच या काळीं वरील निराधार कल्पनेस कारण झालें असावें. बसवेश्वराच्या पूर्वकालीन वीरशैवासंबंधीं लिहिलेला पुढील लेख ह्या माझ्या अभिप्रायाला अनुकूल असल्यामुळें तो वाचकांपुढें मांडणें अवश्य आहे.

भरतखंडांतील धर्मांचा जसा ऱ्हास झाला तसाच उत्कर्ष झाला.

शेंदोनशें वर्षांपुर्वीं या भरतखंडांत सर्व प्रकारच्या मताभिवृद्धीस कोणतीच अडचण नव्हती. निरनिराळ्या मतवाद्यांकडून शक्त्यनुसार आपापल्या मताची वृद्धि व्हावी ह्मणून प्रयत्न झाले आहेत. जैनमत, बौद्धतम, ख्रिस्तमत, मुसलमानीमत, हीं मतें स्थापित झाल्यापासून वृद्धिंगत होत आहेत. ह्याचप्रमाणें ह्या भरतखंडांतही शैव, वैष्णव, अद्वैत व द्वैतादिमतें कालानुसार वृद्धि पावत होतीं. प्रस्तुत कालीं मात्र परधर्मीयांस आपल्या धर्मांत घेऊं नये अशी विलक्षण कल्पना हिंदुलोकांत प्रसृत झाली आहे. सांप्रत धर्मान्तर बहुतकरून बंद झालें आहे. आपला धर्म पूर्वीपासून असा असला तरी तो वाढविणें व दुसऱ्यांस आपल्या धर्मांत घेणें कोणाकडूनही होऊं नये ही विचित्र कल्पना सांप्रत कालीं जशी दृढ झाली आहे तशी पूर्वीं नव्हती. कोण्या एका वेळीं जैन, बौद्ध हीं मतें हिंदुस्थानांत फार प्रबळ होतीं. पुढें उत्पन्न झालेल्या सत्पुरुषांनीं त्या मतांचें खंडन करून स्वमताची वृद्धि केली असा प्रत्येक सत्पुरुषाच्या चरित्राचा सारांश आहे व्यासानें जैन व चार्वाकमतांचे खंडन केलें, शंकराचा-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

यींनें वरील मतांचा विध्वंस करून शैवमत प्रबल केलें रामानुजाचार्यांनें, माध्वानें, वैष्णवमतास पुष्टि आणिली. त्याचप्रमाणें वीरशैवांतील सत्पुरुषांनीं परमतखंडन करून स्वमत प्रसृत केलें यासर्वांस; परमतवाद्यांस स्वमतांत घेतल्यावांचून स्वमतास पुष्टि देतां येणें शक्य नव्हतें. गौतमबुद्ध, ख्रित, महंमद, व्यास, शंकराचार्य, रामानुजाचार्य, इत्यादि सत्पुरुषांनीं स्वमत वृध्यर्थ जन्म घेतला होता. तेंच केवळ त्यांचें कर्तव्य होतें. परंतु बसवेश्वरानें केवळ धर्मप्रसारकरंण्याचेंच काम स्वीकारिलें नव्हतें. तो बिज्जळ राजाचा मंत्री होऊन राज्यकारभार पाहत असे. एकाच कार्यास वाहून घेतलेल्या सत्पुरुषांनीं स्वमताचें बीजारोपण मात्र केलें त्या त्या धर्मांचे हजारों वर्षांनीं मोठाले वृक्ष होऊन ते फलित झाले. धर्मवृद्धि करणें मोठ्या श्रमाचें काम आहे. अनेक ख्रिश्चन पाद्री दीर्घ कालापासून एकाच कामाचा अंगीकार करून फिरत असतांही इतक्या काळांत खिस्तमतवादी किती झाले आहेत? हीच स्थिति इतर सर्व धर्मांची झाली आहे. ह्या गोष्टीचा विचार केला असतां राज्यकारभारांत मग्न झालेल्या बसवेश्वरानें स्वमतप्रसार कितीसा केला असावा याचा वाचकांनींच तर्क करावा. प्राचीन काळीं जैन, चार्वाक, हींच मतें हिंदुधर्मास मुख्य प्रतिपक्षक होतीं. त्यामतांचा नाश करण्याकरितां व्यासापासून प्रस्तुत

बसवेश्वरानें वीरशैवमत चोहोंकडे प्रसृत केलें या विषयीं संशय.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जैन चार्वाकमतें समूळ नष्ट झालीं नाहींत.

कालपर्यंत किती तरी सत्पुरुषांनीं प्रयत्न केले परंतु तीं अद्याप समूल नष्ट झालीं नाहींत. इतक्या सर्वांनीं एवढें अल्प-कार्य केलें त्यांत वीरशैवांचे वांट्यास अत्यंत अल्पांश आला असावा. हें मतखंडन वीरशैवी सत्पुरुषांनींच केलें असावें असें म्हटलें तर सांप्रत हिंदुस्थानाच्या बाकीच्या भागांतल्या प्रमाणेंच दक्षिण देशांत वीरशैवां शेजारींच जैनमतवाद्यांची संख्याही पूर्वी प्रमाणेंच अद्याप कायम आहे. या गोष्टीचा विचार केला तर इतरां प्रमाणेंच वीरशैव सत्पुरुषांनींही आपलें कर्तव्य थोड्या प्रमाणावर बजाविलें यांत संशय नाहीं. प्राचीन काळीं

आतांप्रमाणें पूर्वी प्रवाससाधनें नव्हतीं

आतांप्रमाणें प्रवास करण्याचीं साधनें नव्हतीं, असें असतां एकट्या बसवेश्वराचे प्रयत्न कितपत साध्य झाले असावेत. व त्यानेंहि धर्मप्रसाराकरितां दक्षिणोत्तर किंवा पूर्वपश्चिम दिशांकडे प्रयाण केल्याचा, कोठेंही उल्लेख नाहीं व तसा प्रवासकरणें त्यास साध्यही नव्हतें. मंत्र्याला धर्मप्रसाराचें काम असणें हें असंबद्ध दिसतें.

निरनिराळ्या राजांत ऐक्यभाव नव्हता.

प्राचीन काळीं ठिकठिकाणीं निरनिराळे राजे राज्य करीत होते. त्यांचा राज्यविस्तारहि मर्यादित असे अशा अवस्थेंत केवळ एखांद्या सामान्य राजाच्या बसवेश्वर-मंत्र्यानें दुसऱ्याच्या राज्यांत प्रवेश करून त्याप्रांतांतील लोकांस स्वधर्म-स्वीकार करावयास लाविणें ही गोष्ट केवळ अशक्य असली पाहिजे. कोणी एक

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सार्वभौम राजा कल्याण येथें राज्य करीत होता अशी कल्पना केली तरी इतर मांडलिक राजे आपल्या समजुतीविरुद्ध धर्मप्रसारास अनुमति देतील असें ह्मणणेंहि असंभवनीय होय. प्राचीन काळीं दक्षिणदिशेस पुष्कळ प्रबळराजे राज्य करीत होते. त्यांच्या राज्यांत उत्तरेकडील राजाच्या मंत्र्यानें प्रवेश करून लोकांचें मन कसें वळवावें याचा वाचकांनींच विचार करावा.

द्रविडभाषाप्राशस्त्य

सांप्रतकालीन वीरशैव विशेषतः कर्णाटकी आहेत. जर बसवेश्वरानें धर्मप्रसाराचें काम कल्याण येथें सुरु केलें ह्मणावें तर दक्षिणेकडील वीरशैवांच्या संख्येइतकी उत्तरेकडील वीरशैवांची संख्या असली पाहिजे. ह्मणजे कल्याण हें मध्यवर्ति शहर झालें असतें एकपक्षीं कल्याण शहरीं वीरशैवमताचा प्रसार झाल्यानंतर दक्षिणेकडे ते लोक गेले असें ह्मणण्याचें कोणी धार्ष्ट्य केल्यास दक्षिणेकडील तेलगूप्रान्त वीरशैवांचें उगमस्थान होतें हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. वीरशैवांत प्राचीन काळीं पिळ्ळेनेनारु इत्यादि तेलंगी लोक होते. त्या प्रांतावरूनच त्यांस हें नांव मिळालें आहे (चार्लस ब्राउन नामक विद्वानानें दाक्षिणात्य राजांची वंशावली (Karnatic chronology) नांवाचा ग्रंथ लिहिला आहे त्यांत तेलगू हा शब्द त्रिलिंग नामक शब्दावरून साधला आहे असें त्यानें लिहिलें आहे. इष्ट, प्राण, भाव नांवांच्या त्रिलिंगांचा विचार वीरशैवमतांत आढळतो. ह्या सर्व विचारावरून पाहिलें असतां तेलगूप्रांताची सीमा हीच वीरशैवांचें उगमस्थान असें मानण्यास हरकत नाहीं. असें असतां उत्तरप्रांतीं

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

बसवेश्वरानें बहुतांशीं या मताचा प्रसार केला असें ह्मणणें केवळ मौर्ख्य होय.)

बसवेश्वरअल्पकाळमात्र मंत्री होता.

बसवेश्वरानें बिज्जळ राजाच्या मंत्र्याचें काम फार काळ केलें नाहीं ह्मणजे बिज्जळराजानें इ स. ११६० पासून ११६८ पर्यंत राज्य केलें असें कांहींचें ह्मणणें आहे. ह्या आठ वर्षांत बलदेव कांहीं काळ मंत्र्याचें काम पाहत असे. त्याच्या पश्चात बसवेश्वर मंत्री झाला. फ्लीट साहेबानें लिहिलेल्या कर्नाटक राजाच्या राजवंशावली (Dynasties of Canarise Districts.) नामकपुस्तकांत याविषयीं असें लिहिलें आहे कीं Chalukyas were in possession of Kalyan and Bijjal was their feudatory. He honored much the Shaivas who assisted him in deposing the Chalukya King. ह्मणजे कल्याण शहरच्या चालुक्य राजाचा बिज्जल हा मांडलिक होता तो शिवभक्तांस पुष्कळ मान देत असे त्याच्या साहाय्यानें त्यानें चालुक्य राजास पदच्युत केलें. ह्मणजे त्याला त्याच्या मांडलिकपदाला येण्यास बराच काल गेला असावा व पुढें सार्वभौम चालुक्य राजाला पदच्युत करण्यास पुरें इतकें सामर्थ्य मिळविण्यास कांहीं काल लागला असावा. त्यानंतर कांहीं काळ राज्यकरून तो अपमृत्यु पावला. यावरूनहि त्यानें वर लिहिल्याप्रमाणें ८ वर्षे राज्य केलें असें मानण्यास संशय नाहीं. यांत त्यास साहाय्य करणाऱ्या शिवभक्तांमध्यें बलदेव हा होता. त्यास त्यानें मंत्रीपद कांहीं दिवस दिलें. हा सर्व काल वजा केला तर बसवेश्वरास पांच साहा वर्षे मंत्रीपद मिळालें असावें. एवढ्या

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अल्पकाळांत प्रवासाचीं साधनें नसतां दुसऱ्याच्या राज्यांत हजारों योजनावरील प्रांतांत प्रवेश करून त्यानें एकट्यानें ह्या धर्माचा इतका विस्तार केला असें ह्मणणें असंभवनीय होय इत्यादि कारणांवरून बसवेश्वरानें या मतासंबंधीं य. त्किंचित्‌हि कार्य केलें नसावें हें स्पष्ट होय. हीं कारणें इतिहासास अनुसरूनच आहेत. असें असतां यानेंच हें मत फार प्रसृत केलें व तें सर्व प्रकारें सुधारिलें अशी निरर्थक कल्पना करून व तीवर दृढ विश्वास ठेवून हें ऐतिहासिक गौप्य शोधन केलें आहे असें प्रतिपादन करणाऱ्यांनीं इतिहास डोळे उघडून पाहिलाच नाहीं असें मला वाटतें. असें असतां माझी सुद्धांहि एकप्रकारची कल्पनाच आहे, असा कोणीहि तर्क करूं नये ह्मणून ह्या लेख पुढें विस्तारित करून यथार्थ ऐतिहासिक प्रमाणावरून बसवेश्वराचे पूर्वी वीरशैवमतांत प्रस्तुत कालीन सुधारणा होती व वीरशैवमतवाद्यांची हीच संख्या होती हें दाखविण्यास यथाशक्ति प्रयत्न करीत आहें. वाचकांनीं सत्यांश ग्रहण करावा अशी प्रार्थना आहे.

बिज्जलानें चालुक्य राजाला पदच्युत केलें त्यावेळीं शिवभक्तांनीं त्यास साहाय्य केलें होतें ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. त्यांनींच पुढें बिज्जलाबरोबर युद्ध करून त्याचा पराभव केला. सांप्रत कालींही उत्तरेकडे शिवभक्तांची संख्या फारच कमी आहे. परंतु त्यावेळीं कल्याण शहरीं सार्वभौम राजाबरोबर युद्ध करण्या इतके ते प्रबळ होते; या गोष्टीवरून त्यावेळीं ते फार बलाढ्य असून त्यांचा भाज मोठा असावा असें अज्ञानासहि वा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

टेल. पूर्वींपासून कित्येक राजघराण्यांत राजेलोक वारंवार मतांतर करीत असत. व परमतवाद्यांच्या साहाय्यानें राज्यपद मिळवीत असत. ह्या गोष्टीस अनुसरून बसव मंत्र्यापासून अर्वाचीन कालीं राजघराण्यामध्यें वीरशैव-मताचा जितका प्रवेश झाला त्या पूर्वींहि वीरशैवमताचा राजघराण्यांत जास्त प्रवेश होता असें मागील इतिहासा-वरून स्पष्ट होत आहे. बसवेश्वराच्या पर्वीं झालेल्या ह्या मतांतरासंबंधीं आह्मांस जी ऐतिहासिक माहिती आहे ती येथें सादर करीत आहों.

(१) चालुक्य राजांमध्यें एका तिसऱ्या जयसिंह नामक राजाची वायको सुग्गला नामें होती. तिनें देवरदासिमय्य नांवाच्या भक्ताकडून आपल्या नवऱ्यास वीरशैवदीक्षा दे-वविली असें फ्लीटसाहेबाचें मत आहे तें पुढें विस्तारानें सांगण्यांत येईल.

(२) चोळ राजांत अनेक राजे शिवभक्त होते असें चन्नबसवपुराणावरून समजतें. सत्येंद्र चोळराजाचें चरित्र षडक्षर पंडितानें रचलेल्या राजशेखरविलास नांवा-च्या कानडी काव्यांत आढळतें.

(३) कूनपांड्य इत्यादि पांड्यराजे देखील परम शिवभक्त होते असें बसवपुराणावरून दिसतें.

हा कथाभाग वाचिला असतां ते किती प्राचीन अ-सावेत हें स्पष्ट होतें.

(४) फिलिप ब्राउन नामें पाश्चिमात्य विद्वानानें लिहिलेल्या कर्नाटक क्रॉनॉलजी (Karnatik Chronology) नामक पुस्तकांतील ४१ व्या पानांत एक राजवं-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शावळ दिली आहे. तींत त्रिविक्रम नामक दुसऱ्या राजानें इ. स. १७८ व्या वर्षीं ह्मणजे बसवेश्वरापूर्वीं एक हजार वर्षें जैनमत टाकून तो शिवभक्त झाला असें लिहिलें आहे १६ व्या पुष्करपांड्य नामक राजाला ब्रह्मारि हें पद होतें याचें कारण काय हें समजत नाहीं. २१ वा राजा ख्रिस्ती शकाच्या ९ व्या शतकांत राज्य करीत होता. तो वीरशैव लोकांचा फार पक्षपाती होता असें त्याच पंडितानें लिहिलें आहे. व बसवेश्वराचे पूर्वीं वीरशैव लोक होते असें त्यानेंच स्पष्ट लिहिलें आहे. त्याला आश्चर्य वाटून कर्नाटक क्रॉनॉलजी ह्मणजे कर्नाटकांतील राजघराण्याची बखर नामक वर निर्दिष्ट केलेल्या पुस्तकाच्या ४१ व्या पानांत लिहिलेला मजकूर असा आहे " Yet we know from other documents that Basava the founder of this sect was not heard of before A. D. 1160 " ह्मणजे वीरशैवमत स्थापक बसवेश्वरच होता ह्मणून इ. सन ११६० पूर्वीं त्याचें नांव कोठेंही विश्रुत नाहीं असें कांहीं लेखावरून आह्मांस समजतें. ह्या साहेबाच्या ह्या लेखावरून बसवेश्वर या मताचा संस्थापक होता असें ह्मणणें सयुक्तिक नाहीं असें होतें. हे राजेलोक कोंकणांत राज्य करीत होते ह्या शोधावरून कोंकणांतही पूर्वीं वीरशैव लोक होते असें झालें.

(९) गंगवंशांतील इरयप्पा नांवाचा राजा इ. स. ८५० व्या वर्षीं राज्य करीत होता. त्या वेळच्या कांहीं शिलालेखांतील चित्रें वीरशैवांचीं होतीं असें राइस साहे-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

बाच्या (Mysore Inscriptions) म्हैसूर शिलालेख नामक पुस्तकाच्या २१० पानांत लिहिलें आहे. (on the upper-part of the picture appear the apsaras or nymphs of the Indra's paradise who according to the Veershaiva-doctrines are the portions of brave warriors and bear them in their arms or in the triumphal cars direct from the field of battle to the paradise) या वरून त्या इरयप्पा राजाच्या काळीं वीरशैवांत पुष्कळ लोक रणांगणशूर होते व त्यांनीं जयप्रदर्शन केलें असावें असें वाटतें.

(६) संप्रति निजाम सरकाराच्या राज्यांत असलेल्या एलबुर्गा–गुलबुर्गा (कलबुर्गा) या गांवीं शिंद वंशाचे राजे ८ व्या व ९ व्या शतकांत राज्य करीत असत. त्यांत चामुंड व पेरमडी ह्या दोघां राजांनीं शैवागमांवर विशेष प्रेम ठेवून वीरशैवांस इनाम दिलें आहे. ही गोष्ट पुढें विशेष विस्तारानें सांगण्यांत येईल. इत्यादि ऐतिहासिक प्रमाणावरून बसवेश्वरापूर्वी कित्येक शतकें मध्यप्रांतामध्यें वीरशैव लोक अत्यंत प्रबळ होते असें दिसतें. प्रस्तुतही तेथें वीरशैवांची वस्ति अमून नसल्याप्रमाणें आहे कारण थोडा विचार केला असतां प्रस्तुत कालीन वीरशैवांपेक्षां बसवेश्वराच्या पूर्वीचे वीरशैव बळवंत होते असें स्पष्ट दिसतें.

(७) खिस्तीशकाच्या ४।५ शतकांमध्यें पल्लव राजवंशांतील नंदिवर्म, वीरवर्म, स्कंदवर्म इत्यादि राजे परम शिवभक्त होते असें फ्लीटसाहेबाच्या कर्नाटक प्रांतीय रा-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जवंशावळी (Dynasties of canarise District) नामक पुस्तकांत लिहिलें आहे. ह्या नांवांत " वर्म " हें राजचिन्ह असल्यामुळें बाकी राहिलेला अवशिष्ट भाग म्हणजे नंदि, वीर, स्कंद या शब्दांविषयीं विचार केला तर ते वोरशैवांच्या गोत्रांचीं नांवें आहेत असें समजतें सध्याच्या कर्नाटकच्या इतिहासांत शिवभक्त असें लिहिलें तर आपलें कांहीं नुकसान होईल असें समजून भाषांतरकर्त्यांनीं त्याचा शिवोपासक या शब्दानें उल्लेख केला आहे. लिंगवंत म्हणजे शिवभक्त अशी लोकरूढी आहे. ह्या लोकरूढीप्रमाणें लिहिल्यास लिंगवंतांस गौरव प्राप्त होईल म्हणून कुशलतेनें त्यांनीं रूढींत नसलेल्या शिवोपासक शब्दाचा प्रयोग केला आहे. याच वेळीं बोम्मय्या नामें कोणी एक चालुक्यराजा जयसिंह याचा मांडलिक होता असा फ्लीट साहेबांचा अभिप्राय आहे. राइस साहेबानें लिहिलेल्या म्हैसूर शिलालेख (Mysore inscriptious) नामक पुस्तकाच्या उपोद्घाताच्या ४१ व्या पानांत रट्ट कुलांतील वीरविक्रमनंदी नामक राजानें पूर्वी जैनमत सोडून तो शिवभक्त झाला असें लिहिलें आहे. सारांश प्राचीन काळीं जैनमत प्रबल असतां दाक्षिणात्य सर्व राजघराण्यांत तेंच मत प्रबळ होतें. परंतु क्रमाक्रमानें जसजसा त्या मताचा ऱ्हास होत गेला तसतसें तीं सर्व राजघराणीं शिवभक्त झालीं परंतु हें सर्व कार्य बसवेश्वराच्या पूर्वींच झालें होतें. याप्रमाणें त्याचा कालनिर्णय समजला तितका सांगितलाच आहे. ह्यामध्यें आणखी एक महत्वाचा विचार आहे. तो कोणता म्हटला तर राजा एक मत टा-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कून दुसऱ्या मताचा स्वीकार करीत असतां त्याचा परिवार त्याचेंच अनुकरण करीत असे. हे सेवकजन अन्य मताचा स्वीकार करून त्या मताच्या आपल्या प्रजेस संतुष्ट ठेवण्यास ह्या मतांतरांत शिरत असत. ह्या गोष्टींचा विचार केला तर वीरशैवमत बसवेश्वराचे पूर्वीच फार विस्तृत होतें हें सहजच सिद्ध होत आहे. परंतु ह्याप्रकारें परमतांतून आलेल्या वीरशैवलोकांस सन्मान नसल्यामुळें व बसवेश्वरही तसाच मतांतर करून आल्यामुळें या लोकांत मिसळून तो वीरशैव लोकांतील श्रेष्ठ जंगम लोकांस अनेक तऱ्हेनें संतोषित करिता झाला ह्मणून त्याची दिगंतर कीर्ति झाली. ह्याप्रमाणें तृप्त झालेले जंगमलोक म्लान झालेल्या शिवभक्तीचा उद्धार करण्याकारितांच बसवेश्वरानें अवतार घेतला आहे ह्मणून त्याची स्तुति करूं लागले. कोणा सत्पुरुषानें अवतार घेण्याचें कारण सांगतांना तें मत क्षीणावस्थेप्रत आलें होतें हें सांगण्याची पौराणिकांची पद्धतीच आहे. हें सांप्रत विसाव्या शतकांतील सुशिक्षित लोकांस सांगण्याचें कारण नाहीं. वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें राजघराण्यांत धर्मांतर झाल्यामुळें नवीन मतस्थ लोक जास्त प्रबल होते असें दिसतें. परंतु समासमान लोक विशेष असल्याशिवाय हीं कार्यें घडून येणें दुर्लभ होय. परमतवाद्यांशीं झालेल्या वादावरून त्यांची विद्याविषयक उन्नति असल्याचें स्पष्ट होत आहे.

लेखनविस्तारास कारण.

त्या काळीं ह्मणजे बसवेश्वराचे पूर्वी विद्याप्रमाणानें वीरशैव श्रेष्ठ होते हें सांगण्यांत आलें आहे. सांप्रतच्या राजेलो-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कांस हा पंथ आहे किंवा नाहीं असें भासण्याचें कारण आह्मींच बलहीन आहों हें होय. ह्मणून प्रस्तुतच्या वीरशैवांपेक्षां तत्कालीन वीरशैव अधिक बलवंत होते असें समजलें पाहिजे. परंतु केवळ अलीकडे अलीकडे बसवपुराणादि पुराणग्रंथ वाचणाऱ्या लोकांनीं पूर्वींचे लोक विद्येच्या मानानें अर्वाचीन लोकांपेक्षां श्रेष्ठ होते असें न मानिलें तर त्यांस गारुडिक महत्वानें प्रतिष्टा आली होती असें ह्मणतील ह्मणून हा विषय विशेष विस्तारपूर्वक लिहून मला निश्चित केला पाहिजे बसवेश्वराच्या पूर्वकालीन भक्तसमूहांनीं कित्येक त्यांच्या जैनसभांमधून व अलिंगिब्राह्मणांच्या समाजांमधून त्यांच्या त्यांच्या पंथांचें शास्त्रप्रमाणांनीं निराकरण करून स्वमततत्वें स्थापन केल्याचें हींच पुराणें मोठ्या सरसरीतीनें वर्णन करून पूर्वीच्या लोकांचें शास्त्रैनपुण्यव्यक्त करीत आहेत. तथापि ह्या पुराणांवरून त्यांचा काल निश्चित झाला नाहीं तर त्यापेक्षां बळकट शिलालेखप्रमाण दाखविलें पाहिजे.

त्या काळीं वीरशैवांची संख्या अत्यंत होती हें सांगितलेंच आहे. आतां त्यालोकांचे मठ ह्मणजे गुरुपीठें थोड्या फार प्रमाणानेंही असलींच पाहिजेत. भरतखंडांत सर्व जातींहून वीरशैवांत गुरुसंतति जास्त आहे. कांहीं घराण्यांस एकटाच गुरु असतो. गुरूशिवाय वीरशैवांत घराणें मिळावयाचें नाहीं. हीच स्थिती बसवेश्वराच्या पूर्वी असेल तर त्यावेळीं मठस्थानें पुरेशीं असलींच पाहिजेत. ह्या विराचावरून शोध केला तर प्रमाणें मिळाल्याशिवाय राहावयाचीं नाहींत. दक्षिणेस बेळ्ळीगांवी नांवाचा गांव

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

प्राचीन इतिहासांत प्रसिद्ध आहे. ह्या गांवांतील कित्येक शिलालेख व ताम्रलेख गोळाकरून राईस साहेबानें इंग्लिश भाषेंत भाषांतर करून म्हैसूरप्रांतांतील शिलालेख (Mysore Inscriptions) नामक एक पुस्तक केलें आहे. त्यांत वेळ्ळीगांवीमध्यें असणाऱ्या पांच मुख्य मठांचा वृत्तान्त कोठें कोठें दृग्गोचर होतो. ह्या मठांचीं नांवें अनुक्रमें —१ हिरेमठ २ पंचलिंगनमठ ३ त्रिपुरांतकमठ ४ वामशक्तिमठ ५ कोडीयमठ अशीं आहेत. त्याच पुस्तकाच्या १२२ व्या पानांत पहिल्या तीन मठांतील आचार्यांचीं नांवें क्रमशः पुढील प्रमाणें आहेत. —१ मूळिगमधुकेश्वर पंडित २ सर्वेश्वरपंडितदेव ३ ज्ञानशक्तिदेव — हे आचार्य इ. स. १०५४ मध्यें मठाधिपति होते. पुढें इ. स. १११२ च्या सुमारास ह्या मठांच्या अधिपतींचीं नांवें क्रमशः शांतशिवपंडित, शक्तिपंडित, क्रियाशक्तिपंडित हीं ८२ व्या पानांत सांगितलीं आहेत. ९१ व्या पानावरून ४ थ्या वामशक्तिमठांत सोमेश्वरय्या, विद्याभरणय्या ह्या नांवांचे आचार्य ११२९ इसवी सुमारास होते असें समजतें. १३४ व्या पानांत कोडीयमठ नांवाच्या पांचव्या मठाचें नांव दिलें आहे. ह्या मठांशिवाय श्रीकंठशिवयोगी यांचें चरित्र ८ व्या शिलालेखांत दिलें आहे. तो केदारशक्ति नांवाच्या योग्याचा शिष्य होता. तो श्रीकंठशिवयोगी श्रीकंठास —शिवास अथवा लिंगास— उरावर नेहमीं धारण करीत असे. ह्या श्रीकंठशिवयोग्याचा कंठ वेदवाक्यांनीं भूषित असल्यामुळें त्यास तें यथार्थ नांव प्राप्त झालें होतें. तो शास्त्रांत फार निपुण असून तर्कशास्त्रांत अजिंक्य होता व शिवध्यानांत मग्न, तपश्चर्येंत धीरवान, अत्यंत

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सद्गुणी, असा होता. त्याचा शिष्य सोमेश्वरय्या हा यम, नियम, समाधी व शील यांमध्यें फार निष्णात होता. त्याचा शिष्य मल्लिकार्जुनाचार्य हा प्रसिद्ध कवि होता ह्या मल्लिकार्जुनाचार्यांनें हा शिलालेख आपल्या गुरूंच्या सन्मानार्थ १११२ मध्यें लिहिविला आहे. यावरून श्रीकंठ व केदारशति हे त्यापूर्वी होऊन गेले असावेत असें सहज लक्ष्यांत येईल. ९ व्या पानांत शके १०६३ मध्यें लिहिलेला एक शिलालेख चित्रदुर्ग येथें सांपडला आहे. त्यांत कामय्या, चोळय्या यांनीं, शुद्धगोत्रीय सुजनमित्र व लोकविख्यात अशा महेश्वराला अग्रहार दिल्याचें लिहिलें आहे. ह्या सर्व गोष्टींवरून बसवेश्वराच्या पूर्वी महेश्वर किती विद्याप्रिय होते हें त्यांच्या त्यांच्या नांवांवरून समजतें. प्रत्येकजण पंडित ह्मणून नामांकित होता. एका आचार्याचें नांव विद्याभरणय्या असें होतें. त्या नांवाचा अर्थ असा कीं, विद्या हेंच त्यांचें आभरण. हें केवळ नांवच होतें असें ह्मटल्यास गुरूच्या ठिकाणीं त्याचें विद्यावात्सल्य किती होतें हें व्यक्त होत आहे. असले लोकविख्यात माहेश्वर सांप्रत किती दुर्मिळ आहेत ह्याचा वाचकांनींच विचारकरून सांप्रत स्थितीला व तत्कालीन स्थितीला वीरशैवांत किति अंतर पडलें आहे हें त्यांनींच जाणावें. बेळ्ळीगांवीमध्यें हिरेमठ होता यावरून प्रत्येक गांवांत हिरेमठ होता असें सिद्ध होतें. हिरेमठ (पहिल्यांदा स्थापिलेला मठ) इत्यादि व्यवस्था पूर्वी पासून चालत आली आहे. तींत अलीकडे उत्पन्न झालेल्या बसवेश्वरानें कोणती जास्त सुधारणा केली आहे; याचा रात्रंदि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वस विचार केला तरी मला कांहीं समज होत नाहीं. एका गांवांत पांच मठ होते यावरून त्यावेळीं वीरशैव असंख्यात होते असें कोणाच्या लक्षांत येणार नाहीं ? (जास्त लोक होते हें सहज सिद्ध) ह्मणून बसवेश्वरानें वीरशैवांची संख्या तरी निदान वाढविली नाहीं असें स्पष्ट दिसत आहे. पूर्वीं प्रत्येक गांवीं हिरेमठ इत्यादि व्यवस्था असून शिवाय प्रत्येक गांवांत शेट्टी होते असें वरलिहिलेल्या शिलालेखांवरून दिसून येत आहे. त्या शिलालेखांत कित्येक शेट्टींचीं नावें दिलीं आहेत. त्यांत माचिशेट्टी, माणीकशेट्टी महादेवशेट्टी, सोविशेट्टी, इत्यादींचीं नांवें दिलीं आहेत. सातव्या शिलालेखांत त्यांस वीरबणजिग ह्या पदाचें रक्षण करणारे असें लिहिलें आहे. हे वीरबणजिग ह्मणजे लिंगायतांतील प्रमुख वर्गाचे लिंगबणजिग असें राईस साहेबांनें २३ व्या पृष्ठांत लिहिलें आहे. (These were apparently what are called Linga - Banajigas- Chief sect among Lingayats.) त्याकालचें ऐश्वर्य अमर्याद होतें. दाहाव्या शिलालेखांत १२२–२३ पानांत हे शेट्टी लोक खुष्कीच्या मार्गानें व जलमार्गानें नेपाळ, कुरुंब, कंभोज, गोल्ल, लाळ, बर्बर इत्यादि कित्येक राष्ट्रांबरोबर व्यापार करीत होते असें लिहिलें आहे. हे कैलासनिशाण, व श्वेतछत्रादिक यांचा उपयोग करीत असत असा उल्लेख आहे. आपण लिंगधारी आहोंत असें दाखविण्याकरितां ते आपल्या इष्ट देवतेस मस्तकावर धारण करीत असत असें त्याच दाहाव्या शिलालेखांत लिहिलें आहे. त्याचें इंग्रजी भाषांतर त्यांनीं कसें केलें आहे ह्मटलें तर bearing

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

on their ... counting them as Mahadeva their Istadeo. वर सांगितलेला श्रीकंठयतीश्वर इष्टदेवतेला उरा वर धारण करी असें लिहिलें आहे. हे आपल्या मस्तकावर धरीत होते याचा अर्थ असाकीं शिरःपूर्वक ह्मणजे अत्यंत भक्तिपुरःसर धारण करीत असत असें समजलें तरी सयुक्तिक होईल. आठव्या शिलालेखांत त्या देशाच्या राजानें मेवीशेट्टी या नांवाच्या व्यापाऱ्याबरोबर आपल्या देशांतील सर्व व्यापारावर जकात माफ केल्याविषयींचा करार केला होता. ह्या वरं लिहिलेल्या सर्व माहितीच्या खरेपणाकरितां हा पुढील सर्व शिलालेख इंग्रजी भाषांतरासहित येथें लिहिला तर मोठा विस्तार होईल. ह्मणून लहानशा ८ व्या शिलालेखाचें इंग्रजी भाषांतर येथें देतों:—

(*Mysore Inscription by Rice page 82-83-84-85*)

8 SHILA—SHASAN BELLIGAVI.

A. D. 1112

While Tribhuwan Malla Kamadevarasu was ruling the kingdom in the enjoyment of piece and wisdom

One day a discourse on Shiva-Dharma, the Shiva-Dharma-shasan being quoted, to the effect that Dharma is the root of the vine of fame. Dharma is beloved in both the worlds Save the man devoted to Dharma there is none worthy of reverence in the world and the divine discourse. There on Someswar Pandit Deo a worshiper of spirit of great

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

learning, having conceived a desire to perform the works prescribed for Shiva—Dharma. Tribhuwan Malla having bestowed ...... was protecting Banawasi and the Malahar: also with pure shining fame.

Washing the feet of Mebi-shetti the son of Bhuwananayak shetti; the son of Mebi shetti called the Pattan-sami the chief officer (Janapann) in the beautiful Royal city, Ballipur which was an ornament to the four quarters of Banawasi.

Making an agreement regarding the gifts of the free-hold land attached to the lotus garden and 110 komuca of excellent land with pouring of water and with the knowledge of as many as belonged to that royal city of Ballipur (to wit) of the fame of the five Matha-sthan of that great Royal city of Belligavi of Shanta shiva Pandit Achari of Piriya-Matha, Shekti Pandit Achari of the Pancha-Linga-Matha, Kriyashekti Pandit Achari of the Tripurantaka Matha, Muliga Pandya Jiya Nagara Pandya Savi shetti and others; with the knowledge of all these five Mathasthana Nagara and Tripura, he presented that land situated in the tract belonging to the Tavargeri beloved by all the people of the earth, having on the east the garden formerly presented to Kedareshwar, on the south Lotus garden, west a stone he set up. North the garden of Lotus. The land with these boundaries Dandadhisha Govinda the king of that

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

Nad, worthy of praise from all people gave with a heart - felt devotion to shiva. And at that time in that manner the lord of the land settling with Mebi shetti for freeing it from all imports gave a permanent order that the five Matha Nagar should continue it free of all dues.

Moreover among the Kalamukha descended in the line of security for three boons obtaining fame among those great shaktis the Rainy Season to the Chatak-birds his disciples was the pure Shree Kantha praised by all the learned son of Kedar shakti bearing Shree kantha (shiva) over on his breast of a Shree *kantha* (holy throat) filled with the choise-words of the Weda deeply versed in the science of mind he was invincible in argument like pure gold perfumed placing the feet of shiva as an ornament on his head. possessed of all the secure merit of great, self chosen husband of the lady of wealth adorned with all good qualities, such was Shree kantha yogishwar. The son of Shree kantha was Someshwar reverenced by all the world of yatis. Shree kantha (shiva) himself in the form of a muni, a Wishnu to the Rakshasa of sin, Someshwar Pandit Deo, thus praised by all people perfects in yama ... ... Samadhi and shila for repairs of Dakshina Kedareshwar on the Tavargeri Souh of Belligavi ... ... This ornament of kings ...... washing the feet of that great son of learning .... pouring

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

water, this king of fame presented it... Mallikarjuna Acharya a most able poet, disciple of that great Sim of learning wrote this Shasana of a Shiva-Dharma although newly created so as to be praised by all poets.

विशेष माहिती पाहिजे असल्यास वाचकांनीं तें पुस्तक पाहिलें असतां समजेल. त्या काळीं ह्या शेट्टी शिवाय प्रत्येक गांवीं अधिकारस्थ पाटील सुद्धां असत असें दाहाव्या शिलालेखांत लिहिलेल्या कांहीं पाटिलांच्या नांवांवरून समजतें. त्यांतील कांहीं भागांचें इंग्रजी भाषांतर खालीं देत आहे:—

" The worthies of the Nagar Khanda seventy Sovi-Deva the chief, Konawatti Prithwi shetti, Begur Keta Gavada, Magundi Sanka gavada, Malavalli Keta gavada, Elamballi Keta Gavada, Madlur Kala Gavada and all the Prabhu Gavadas gave for the God five pana a year for each village."

यांत प्रभुगौड या शद्बाचा थोडा विचार केला तर तत्कालीन पाटील एकैका गांवाचा पूर्ण अधिकारी असून त्यास प्रभु ही संज्ञा होती असें समजतें. स्थूल दृष्टीनें पाहिलें तर आतांच्या प्रमाणें त्या काळचे पाटील सरकार तर्फे वरिष्ट असून शेट्टीसमाजाधिपति असत व माहेश्वर ईश्वराचे अंशभूत असून धर्मविषयांत गुरुस्थानीं असत. त्या वेळच्या समाजाचे कांहीं थोडे भाग त्याच शिलाशासनांत दिले आहेत. ते कोणते ह्मणाल तर (of Gavaregalus, of Gotrigas, Shettis, Shetti-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

guttas, Ankekaras, Biras, Bira Banigas Gandhigas, Gamundas and Gamunda Swamis गवरेगळु गोत्रिगरु शेट्टरु, शेट्टिगुत्तरु, अंककाररु, वीर वीरवणिगरु, गन्धिगळु, गामुंडरु, गामुंडस्वामि हे सर्व लिं गवंत होते असें मी प्रमाणपुरःसर सिद्ध केलें नसलें तर त्या काळची समाजस्थिति वाचकांस माहीत असावी ह्म णून येथें यांचा उल्लेख केला आहे. तथापि लिंगस्थापन करण्याचे वेळीं वीरशैवमठस्थलोक, शेट्टीलोक, पाटील यां सर्वांबरोबर त्यांचीं नांवें दिलीं आहेत व ह्यासर्वांकडून त्या देवास नजराणा द्यावयाचा ह्मणून हे लिंगवंत होते असें अनुमान निघतें. सारांश हा शिलालेख इ. स. १०९८ व्या वर्षीं लिहिला गेला असल्यामुळें बसवेश्वराच्या पूर्वी सु मारें १०० वर्षांचा जुना आहे. वीरशैव समाजस्थिति या काळच्या वीरशैवांच्या स्थितीपेक्षां चांगली होती अ सें ह्मणण्यास हरकत नाहीं. कारण माहेश्वर लोक वि द्येंत निष्णात असून आचार्य, पंडित ह्मणून नामांकित होते शेट्टीलोक स्वदेशी परदेशी लोकांबरोबर बरोबरीच्या ना त्यानें व्यापार करीत असत व जलपर्यटनही करीत असत पाटील लोक आपापल्या गांवाचे सर्व अधिकार संपादन क रून गांवचे स्वामी असें मानिले जात. आतां मात्र हे सर्व लोक विपरीत स्थितीस पोंचले आहेत. कसें ह्मटलें तर मा- हेश्वर अक्षरशत्रु झाले आहेत. व्यापाऱ्यांस जलपर्यटन, परदेश ह्मणजे काय यांचा गंधही नाहीं व पाटील लोक आपल्या हाताखालील कारकुनाच्या हातांतील कळसूत्री बाहुल्या झाले आहेत. येथपर्यंत वीरशैवसमाजाची पूर्व

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

स्थिति व अर्वाचीन स्थिति यांतील अंतर समजल्यासारखें झालें. बसवेश्वरानंतर अलीकडे अलीकडे हिंदुस्थानांत जसजसे परदेशी लोक प्रवेश करूं लागले तसतशी सर्व हिंदु लोकांची उत्तम स्थिति जशी अधोगतीस गेली तशीच वीरशैवांनीही स्थिति झाली. तथापि बसवेश्वरापूर्वी हा समाज उत्तम स्थितींत होता यांत संशय नाहीं गुरुपीठें, हिरेमठ इत्यादि व्यवस्था बसवेश्वराचे पूर्वी पासून फार काळ चालत आली आहे. शेट्टी इत्यादि पदवीधर लोक पूर्वींही होते. एकाच गांवांत पांचमठ, व श्रीकंठशिवयोगी सारखे यतिश्रेष्ठ असल्यामुळें वीरशैवसमाज बसवेश्वराचे पूर्वींही मोठा होता असें निर्विवाद दिसतें. यति वर्गाचे लोक गुरुशिष्य परंपरेनें एकाच गांवांत पुष्कळ दिवस राहत असत असें केदारशक्ति, श्रीकंठयोगीश्वर, सोमेश्वरपंडित, मल्लिकार्जुनाचार्य हे एकाच गावीं वास करीत होते या गोष्टी वरून समजतें (ह्मणजे निराभारि जंगम लोक शास्त्रानुसार शहरांत ९ दिवस राहत असत व खेड्यांत १ दिवस राहत असत असा त्यांचा शास्त्रोक्त क्रम होता.) ह्या सर्व हकीगतीवरून व समाज संख्येवरून अथवा इतर स्थितीवरून वीरशैवसमाजांत बसवेश्वरापासून कांहींही कमी जास्त फरफार झाला नाहीं हे सांगण्यांत आलें. तथापि समाजाची सुधारणा झाली आहे असें ह्मटलें तर तीही झालेली दिसत नाहीं. कारण सांप्रत वीरशैवसमाजांत दिसून येणारे सर्व पोटभेद बसवेश्वराचे पूर्वींही होते असें ह्मणण्यास हरकत नाहीं पूर्वी वीरबणजिग ह्या पोटभेदाचे लोक होते ते सध्या असलेल्या लिंगबणजिगाचे पू-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वेज असें मागें लिहिण्यांत आलें आहे. यांचीं नांवें शिव-धर्म शिलालेखांत दिलीं असल्यामुळें हे त्या वेळीं फार भाक्तिमान होते असें दिसतें. त्याचप्रमाणें मला माहीत असलेल्या पोटशाखांपैकीं कोणकोणत्या बसवेश्वराचे पूर्वीं होत्या हें खालीं लिहिलेल्या माहितीवरून समजण्यांत येईल. मलवई—रॉयल एशियाटिक सोसायटी (Royal Asiatic Society) च्या मुंबई शाखेच्या (Bombay branch) १८७९ इ. स. च्या ११ व्या रिपोर्टाच्या (Voluma XI) २२७—२७७ पानापर्यंत कानडी लिपींत चार ताम्रपट इंग्रजी भाषांतरासहित दिले आहेत. पहिल्या शासनांत चाउन्ड राजा व त्याची बायको महादेवी व पेरमडी नांवाचा सिंदवंशीयराजा हीं निझामप्रांतांत ज्यास हल्लीं कलबुर्गा असें ह्मणतात त्या गांवीं राज्य करीत असत. त्यांविषयीं त्यांत विशेषणात्मक " शिवागमसमाकर्णनकर्णपूररुम् " असें वाक्य लिहिलें असल्यामुळें ते शिवागमांत भाक्तिमान् होते असें दिसतें, ह्यांत नीलकंठ-पंडितदेवास जमीन इनाम दिल्याची हकीगत आहे त्या भूमिसभोंवती लिंगमुद्रा घातली होती असें शेवटीं लिहिलें आहे तें कसें ह्मणाल तरः—

सर्वसमस्यवागि विट्टभूमिय स्थलम् ।
मुदमोळलदारियिं बडगणवयवळदिम् ।
त्यंकणवासि गाउन्डन वळदिमुउत्तर ।

मूवत्तारक्के लिंगमुं तपोधनरुं.कवितेयुम् बेरसु माडि हें पाहिलें असतां त्या काळीं लिंगमुद्रा घालण्याचा परिपाठ होता असें दिसतें व ह्या शासनांत वर सांगितलेल्या रा-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जाविषयीं असलेलें दुसरें विशेषण कोणतें ह्मटलें तर "मलवरं तोळ्दाट्टिदं" ह्मणजे पेरमडी राजानें मळवरास जिंकिलें. ह्या मलवरासंबंधीं ह्रीटसाहेबानें २३४ पानांत एक टीप दिली आहे. ती कोणती ह्मणाल तरः—

There is a Division of the Lingayats called Malavaru which is found only in the country lying along the Western Ghats. They are people of some wealth and position and they intermarry only among themselves; they are to be met with especially at Banawasi, Sound, Sirsi, Indur, Bandewadi and Punganur; The village–head–men of Indur and Ekkambi near Sirsi are Malavas. It is one of the Malavas of Indur who is the head of Bandewadi Sansthan and his wife is from one of the malava-families of Punganur. He styles himself as "arasu" or King as also the head of Punganur-family to which his wife belongs. The Malavas are also mentioned by Dr. Buchuan who in describing the country in the neighbourhood of Banavasi, states (Vol II p. 378) that most of the village–head–men are Malavas and that they are a low class of Shivabhaktas.' शिवभक्तांपैकीं मलवरु हे एक पोटभेद आहेत असें सांगण्यांत आलें आहे. व कांहीं लोक मलव हा शब्द. मले ह्मणजे टेकडी असा अर्थ असल्यामुळें डोंगराळ प्रदेशांतील लोक ह्या अर्थाशिवाय दुसरा त्या शब्दाचा जातिवाचक अर्थ नाहीं असें प्रतिपादन करूं शकतील. परंतु सर्व डोंगराळ प्रांतांतील लोकांस मलव हें नांव

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

असतें तर वरील मत सत्य ठरलें असतें व वनवासी, सौंड, सिरशी, इन्दूर, एक्कंबी, बांदेवाडी, व पुंगनूर ह्या सर्व गांवांतील लोकांस मलवरु असें ह्मणतां नये. ह्मणून मलव हा शब्द " मले " ह्मणजे डोंगरीप्रदेश ह्या शब्दांपासून व्युत्पन्न असला तरी जातिवाचक आहे असें निर्धारिलें पाहिजे. ह्या चार ताम्रपटांत १ ला व २ रा हे ताम्रपट शके ८७२ ह्मणजे इ. स ९५० मध्यें लिहिले गेलें आहेत. ह्मणून मलव नांवाचे पोटवर्गाचे लोक बसवेश्वराचे पूर्वी २०० वर्षांपासून आहेत असें झालें. इतकेंच नव्हे तर ते पेरमडी राजाबरोबर युद्ध करण्याइतके सामर्थ्यवान् होते असें दिसतें. पेरमडी राजा शिवागमांत भक्तिमान असल्यामुळें नीलकंठपंडितदेवाला भूमि देऊन तीस लिंगमुद्रा घातल्या असल्यामुळें व महादेवा असें नांव कांहीं पुराणांत आढळत असल्यामुळें ह्या सिंदवंशाचे राजे लिंगवंत असले पाहिजेत. ते व मलव यांमध्यें झालेल्या युद्धप्रसंगांविषयीं विचार केला तर लिंगवंत आपापल्यामध्यें एकमेकांशी झगडत असत असें होते. ह्मणून बसवेश्वराचे पूर्वी सुद्धां लिंगवंतांच्या पोटवर्गांत कोणत्या कां होईना परतु प्रसंगोपात कलह होत असत. ह्या ताम्रपटांत सुद्धां पांच मठ एका ठिकाणीं असल्याचें लिहिलें आहे. ह्यांपैकीं ४ थ्या शासनांत सर्वेश्वर नामक पंडितास इनाम जमीन दिल्याची हकीकत आहे. त्यांत त्यांच्या पूर्वजांच्या वर्णनावरून त्या कालची लिंगायतांची स्थिति दिसून येते. कशी ह्मणाल तर —

भस्मोद्धूलितगात्ररुं कौपीनाजिनरुं

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रुद्राक्षमालाधाररुं वातुलागमसमयस –
मुद्धाररुं जंगमलिंगावताररुं –.

ह्या वरून शिवागमामध्यें वातुलागम फार स्तुत्य होता असें दिसतें. हें ताम्रशासन शके ११७४ मध्यें बोम्मरस नांवाच्या कोणा मनुष्याकडून लिहिलें आहे. त्यांत त्यानें आपल्या स्वतःविषयीं "दंडनायकबसवदेवन मुद्दु" ह्मणून व "कलिदेवरदास" ह्मणून विशेषणें आपल्यास लावून घेतलीं आहेत. ह्मणून कलिदेव नामक ग्रन्थकर्त्यानें १२व्या शतकांत "कलिदेवरवचन" नामक ग्रन्थ रचून लोकांस समजविला असें दिसून येतें व वचनग्रंथांत बसवेश्वर वचनें, प्रभुदेव वचनें हीं लोकांत सन्मान्य झालीं आहे. तीं झालीं तरी कमी जास्त प्रमाणानें त्याच कालचीं असल्यामुळें बसवेश्वरानंतर अलीकडे वचनग्रंथ लिहिले गेले असावेत असें दिसतें शिवशिंपिगरु, नागलिकरु नेकाररु हे पोटवर्ग देखील बसवेश्वराचे पूर्वीं होते असें अनुमान निघतें. शिवशिंपिगरु हे आह्मी शिवदासिमय्य नामक शरणाचे सांप्रदायिक आहों व नागलिक हे शंकरदासिमय्य नामक शरणाचे आह्मी सांप्रदायिक आहों असें ह्मणतात व नेकार (विणकर लोक) आपण देवरदासमय्य यांचे सांप्रदायिक आहों असें ह्मणतात. व हे लोक आपापल्या शरणांचीं चरित्रें धनव्यय करून भक्तिपूर्वक श्रवण करितात. नागलिक लोकांच्या मोहल्यांत बहुतकरून शंकरलिंगाचीं देवालयें असतात. कारण जडियशंकर नामक देवापासून शंकरदासिमय्य ह्यानें उपदेश घेतला होता असें त्याच्या चरित्रावरून दिसतें. त्याचप्रमाणें

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रामलिंगेश्वर ह्यानें देवरदासिमय्य यास उपदेश केला असल्यामुळें विणकर लोक आपल्या मोहल्यांत रामलिंगाचीं देवालयें बांधितात. ह्याप्रमाणें निरनिराळे पोटवर्ग आपापल्या निरनिराळ्या शरणांना आपले गुरु किंवा आदिपुरुष असें मानून त्यांच्या त्यांच्या पुराणश्रवणांत तल्लीन झाल्याचें पाहिलें ह्मणजे त्या शरणांचा त्या त्या पोटवर्गाशीं कांहीं तरी संबंध असावा असें वाटतें. ह्मणजे ते शरण त्यांचे आदिपुरुष किंवा त्या पोटभेदाचे उद्धारक असावेत असें दिसतें. हे तिघे शरण समकालीन असावेत असें पुराणावरून दिसतें; तें कसें ह्मणाल तर बसवपुराणांत माचिदेवानें बसवेश्वराचा गर्व परिहार करून शंकरदासिमय्यानें देवरदासिमय्याचा गर्व परिहार केल्याची पूर्व शरणाची कथा स्वकृत्यास उदाहरण ह्मणून सांगितली आहे. व एकांतरामय्या यानें एका जैनमतवाद्याशीं वादप्रसंगीं देवरदासिमय्य नामक शिवभक्तानें पूर्वकालीं जैनांचा वादांत पराभव केल्याची कथा सांगण्यास आरंभ केला आहे ह्यावरून हे देवरदासिमय्य व शंकरदासिमय्य हे दोघे बसवेश्वराच्या पूर्वीचे होते असें झालें ह्या दोघांत देवरदासिमय्य हा पश्चिम चालुक्य राजा तिसरा जयसिंह (देसिंग) ह्याच्या काळीं ह्मणजे शके ९४० पासून ९६४ पर्यंत केव्हां तरी होता असें फ्लीटसाहेबानें कर्नाटक देशांतील राजघराण्याविषयीं लिहिलेल्या इतिहासाच्या (Dynasties of canarise Districts) ४९व्या पानांत पेटलकेरी नामक एका गांवाच्या नांवाविषयीं दिलेल्या टिपणीतील पुढील मजकुरांत लिहिलें आहे.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

This should be a very well-known plan being the slightly differently spelt Hotalkeri of the Basavapuran ch XI in which it is said that it contained seven hundred jain Basadis or jain-temples and twenty thousand jain-saints; the subject of which is how Devardasimayya the Guru of Suggaladevi the wife of the king Desinga dispoiled the Sravakas or jains and induced Desing to adopt the Shaiva or Lingayat religion. The same story is epitomised in the channa-basava-puran LVII –10 which says that Suggala the wife of the jina-bhakta Desinga Ballal caused her Guru Devardasimayya to dispute with the jains and then transforming a serpant in a box into a linga made of the chandrakant or moonstone she caused him to conquer and induced her husband to become a shivabhakta and soon &c. The Channa-basava-puran calls Desinga a Ballal or Hoysal but this is evidently a mistake. Desinga is a corruption of Jayasinha and the coincidence of the other names of Suggala and Potalkeri shows conclusively that the story really refers to the western chalukya king Jayasinha III whose wife was Suggala and one of whose capitals was Potalkeri. "

ह्या वरील टिपेचा सारांश असा आहे कीं, सुग्गलादेवी नामक एका राणीनें आपला गुरु जो देवरदासिमय्य याजकडून जैनांचा पराजय करवून जिनभक्त असलेल्या आपल्या नवऱ्याला होटलकेरी नांवाच्या गांवांत शिवदीक्षा देववून लिंगवंत केलें ही कथा बसवपुराणाच्या ११ व्या अध्या-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

यांत व चन्नबसवपुराणाच्या ५७ व्या अध्यायांत १० व्या श्लोकांत दिली आहे. परंतु चन्नबसवपुराणांत देसिंगराजा हा बल्लाळ राजा होता असें लिहिलें आहे तें चूक आहेसें दिसतें. देसिंग हा शब्द जयसिंह ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. हा जयसिंह शके ९४० पासून ९६४ पर्यंत राज्य करणारा तिसरा चालुक्य जयसिंह हा होय. ह्यास फ्लीटसाहेबानें दिलेलें प्रमाण असें आहे कीं, —

१ पोटलकेरी नांवाचा गांव चालुक्य राजाच्या राजधान्यांपैकीं एक राजधानी होती. व बसवपुराणांत असलेलें होटलकेरी नांवाचें गांव व पोटलकेरी हें नांव हीं दोन्हीं एकाच गांवाचीं नांवें होत. कारण कर्नाटक भाषेंत कांहीं शब्दांत पकारास हकारादेश होत असतो.

(२) चालुक्य जयसिंह राजाची बायको सुग्गलादेवी नांमें होती हें शिलालेखांत दिसणारें नांव पुराणांत सुद्धां जयसिंह नांवाच्या राजाच्या बायकोचें नांव ह्मणून आढळत आहे. ह्याप्रमाणें पोटलकेरी व सुग्गलादेवी हीं दोन्हीं नांवें पुराणांत व इतिहासांत सारखीं आढळत असल्यामुळें पुराणप्रसिद्ध जयसिंह राजा हा चालुक्य घराण्यांतील होय असें सिद्ध होतें. हीच गोष्ट सिद्ध करण्यास दुसरीं कांहीं प्रमाणें आहेत, तीं कोणतीं ह्मटलीं तर —

(३) चालुक्य जयसिंहास जगदेकमल्ल ह्मणून दुसरें नांव अथवा पदवी होती असें वर सांगितलेल्या इतिहासांत दिलेल्या चालुक्य वंशावळीवरून दिसून येतें. बसवपुराणांत शंकरदासिमय्य यानें जेडर देवरदासय्य याचा गर्व हरण केल्याची कथा जगदेकमल्ल नांवाच्या राजाच्या

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कारकीर्दींत घडली असें लिहिलें आहे. परंतु शंकरदासिमय्य याच्या पुराणांत जयसिंहाबरोबर वाद चालला होता असें लिहिलें आहे. तो कसा झणाल तर —

सृष्टिपतिजयसिंहरायन। कोट्टणवमारियरकैयाळि। कुट्टिसिद्रोलविंदशंकरदासिमय्यगळु ॥

(४) चालुक्य जयसिंह राजाच्या पोटलकेरी व कल्याण अशा दोन राजधान्या होत्या असें वर लिहिलेल्या इतिहासांत फ्लीटसाहेबानें लिहिलें आहे. त्याचप्रमाणें बसवपुराणांत होटलकेरी राजधानी झणून व शंकरदासिमय्याच्या पुराणांत कल्याण झणून त्याच्या दोन राजधान्या होत्या असा उल्लेख आहे. सारांश असा कीं, राजधानीचें गांव होटलकेरी, सुग्गला नांवाची बायको, राजाचीं दोन नांवें, व ह्याच्या दोन राजधान्या ह्या चार गोष्टीशीं इतिहासाचें व पुराणाचें साम्य असल्यामुळें देसिंग झणजे चालुक्य वंशांतील जयसिंह हाच होय असें निर्विवाद झालें. ह्या चालुक्य जयसिंहानें बसवेश्वराचे पूर्वी शके ९४० पासून ९६४ पर्यंत राज्य केलं. झणून देवरदासिमय्य व शंकरदासिमय्य हे बसवेश्वराच्या पूर्वींचे होते ही इतिहासानें सिद्ध असलेली गोष्ट बसवपुराणांत सांगितल्याप्रमाणें पूर्वींच्या लोकांचें चरित्र होतें असें निश्चित झालें. आतां बसवेश्वर, चन्नबसवेश्वर, प्रभुदेव जसें पुराणनायक होऊन गेले त्याचप्रमाणें शंकरदासिमय्य, देवरदासिमय्य, शिवदासिमय्य, वक्रपादमुनीश्वर पुराणनायक होऊन लिंगायतांत प्रसिद्ध झाले आहेत परंतु बसवपुराण, चन्नबसवपुराण, प्रभुदेवपुराण हींच प्रस्तुतकाळीं

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

विशेष प्रसिद्धीस येऊन लोकांत रूढ झालीं आहेत. हीं खालीं सांगितलेल्या दासिमय्यांचीं पुराणें वरीलप्रमाणें विशेष प्रसिद्ध न होतां, त्या त्या पोटवर्गांतच विश्रुत असल्यामुळें बसवेश्वरादि तिघांच्या काळीं लिंगायतांची वृद्धि झाली हा खोटा समज लोकांत पसरला आहे. परंतु बसवेश्वराच्या काळीं झालेल्या अभिवृद्धीपेक्षां वर सांगितलेल्या दासिमय्यांच्या काळीं लिंगायतांची वृद्धि जास्त झाली असें त्या त्या पुराणांचें मनन केलें असतां समजून येईल. बसवेश्वराकडून जसा बिज्जल पराभव पावला तसें त्याच कल्याण शहरीं पूर्वीं जयसिंहाचा ह्या दासिमय्याकडून वादांत पराभव झाला. बसवेश्वरादिकांनीं जसें वीरशैवांचें वर्चस्व राखिलें तसेंच ह्या दासिमय्यांनीं त्यांच्या वर्चस्वाचा गौरव राखिला. आतां दासिमय्यांच्या काळीं शिवभक्त विरळ असावेत. आतांसारखा त्यांचा समाज नसावा अशी कोणी शंका घेतली तर त्यानीं त्या त्या शरणांचीं पुराणें लक्ष्यपूर्वक वाचिलीं असतां त्यांच्या ह्या समजास विरुद्ध ह्मणजे त्यावेळीं शिवभक्तांचा समाज मोठा होता असें त्यांस दिसून येईल. देवरदासिमय्य यानें शंकरदासिमय्य यांस आपल्या गांवीं आणिलें त्यावेळचा समारंभ वाचून पाहिला तर त्यावेळीं भक्तसमाज फार मोठा होता असें दिसून येईल. कसें ह्मणाल तर —

[भाळलोचन भक्तअर्पुद । कोळि मुदनूर्दासिमय्यम् । हेळलळवेसंतसदि, तन्नूरोळिह भक्त । जाळसाहितं कळसकन्नाडि । मेळदेळे वेंगळ नोरलुतिहकाळेगळ बहुवाद्यघोषणेयिंद लिदिगोंडम् ।] या प्रमाणें कानडींत आहे. ह्यांत दिसून

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

येणाऱ्या " भक्तजाळसहितं " ह्या शब्दाविषयीं विचार केल्यास एका मुदनूर नांवाच्या गांवांत अनेक भक्त लोक होते असें दिसतें. ह्याचप्रमाणें जयसिंह ह्यानें शंकरदासिमय्य यास कल्याणपट्टनाला बोलाविलें त्यावेळीं कल्याणांत असलेल्या भक्तजनांस बोलावून सांगितलेल्या गोष्टींचा विचार केला तर तेथेंहि पुष्कळ भक्त लोक होते असें दिसतें. परदैवदूरीकरण बसवेश्वराचे काळीं असल्याप्रमाणें त्याचेही पूर्वीं ह्या दासिमय्याचे काळींही होतें. शंकरदासिमय्य यास "परदैवकोलाहल" असें नांव पडलें होतें. आपल्या दृष्टीनें विष्णुमूर्तींचा भंग केला असें त्याचग्रा पुरा गांत सांगितलें आहे. बसवपुराणांत जैना बरोबर घडलेले प्रसंग (झालेले संवाद) पाहिले असतां पूर्वीं पूर्वकालीन शरणांनीं जैनास जिंकून त्यांस वीरशैव दीक्षा दिली असें सिद्ध होतें. बसवेश्वरानें किंवा त्या वेळच्या दुसऱ्या एखाद्या सत्पुरुषानें असुकच परमत वाद्यांस वीरशैव दीक्षा दिल्याचें कोठेंही लिहिलें नाहीं. एकाच होटलकेरी गांवांत देवर दासिमय्यानें २० हजार जैनांस लिंगदीक्षा दिल्याचा उल्लेख आहे. अस्तु. जेडरदासिमय्य, नागलीकदासिमय्य, शिवशिप्यांचा शिवदासिमय्य हे सर्व बसवेश्वराचे पूर्वीं शेंदीडशें वर्षें होऊन गेले असें सिद्ध असतां त्यांचे त्यांचे सांप्रदायिक ह्मणून मानणारे नेकार, नागलीक इत्यादि वीरशैवांतर्गत पोटभेद सुद्धां बसवेश्वराच्या पूर्वींचे होते असें सिद्ध झालें. ह्या प्रमाणें क्रमशः शोध केला असतां बहुतेक पोटभेदांचे लोक बसवेश्वराच्या पूर्वींचे आहेत असें सिद्ध होईल. ह्मणून कित्येक पोटवर्गीय लोक बसवेश्वरा-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नंतर अलीकडे अलीकडे वीरशैव झाले आहेत असें प्रतिपादन करणारे निरुत्तर होतील असें वाटतें. कल्याण ह्मणजे सध्यां निजाम सरकारच्या राज्यांत असलेलें कल्याण नांवाचें शहर कांहीं कालीं फार ऊर्जितावस्थेंत होतें. मोंगलाच्या कारकीर्दींत दिल्ली शहर जशी हिंदुस्थानची राजधानी होती किंवा पेशव्यांच्या वेळीं पुणें शहर जशी मध्य प्रांतांत दक्षिणेकडील राजधानी होती तसें मुसलमानांनीं दिल्ली शहर काबीज करण्यापूर्वीं कल्याण हें हिंदुस्थानची किंवा त्यांतील मोठ्या भागाची राजधानी होती. बसवेश्वर व बिज्जल राजा यांचे काळीं जितकें कल्याण शहर भरभराटींत होतें तितक्याच वैभवांत तें पूर्वींपासून कित्येक वर्षें चालत आलें होतें, व तेथें पूर्वींपासून वीरशैव फार प्रतिष्ठित होते. तेथें त्या वेळीं असलेल्या मठांची संख्या व त्यांचा विस्तार पुराणांत वाचला तर तें शहर आतां पेक्षां किती तरी मोठें असावें असें दिसतें आतां पुराणांत अतिशयोक्ति असण्याचा संभव आहे परंतु ही अतिशयोक्ति वजा केली तरी त्या विस्तारास मर्यादा नाहीं असें दिसतें. हें कल्याण शहर ह्या प्रमाणें हिंदुस्थानांत प्रसिद्ध मुख्य शहर असतांना तेथील वीरशैवांचा उत्कर्ष ऐकून त्या त्या काळचे प्रमुख वीरशैव त्या शहरांत शिरून दुसऱ्यास जिंकीत असत. जयसिंहानें शंकरदासिमय्य यांस मोठ्या सन्मानानें कल्याण शहरास बोलावून नेलें. देवरदासिमय्य हा मुदनुर गांवाहून येऊन जयसिंहाची बायको सुग्गला हिचा आश्रय करून राहिला. बसवेश्वर हा विजापूर जिल्ह्यांत असले-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

स्या वागेवाडी नांवाच्या गांवाहून कल्याणास जाऊन राहिला प्रभुदेव हा त्याहून दूर असलेल्या कर्नाटकाच्या मध्यप्रदेशांतून जाऊन कल्याणांत शून्यसिंहासनावर आरूढ झाला. वसवेश्वराच्या पूर्वी वीरशैव लोक दक्षिणेंतून कल्याण शहरीं भरल्याप्रमाणें त्यानंतर किंवा त्याहून ऐलीकडे तेच वीरशैव तें शहर सोडून दक्षिणेस येऊं लागले. यावरून कल्याण शहरीं वीरशैवांचें वैभवाचा उत्कर्ष झाला असावा. चालुक्य वंशांतील तिसरा जयसिंह हा शके ९४० च्या सुमारास वीरशैव झाला. तोच चालुक्य वंशाचा शेवटचा सार्वभौम राजा होय. बिज्जलाकडून पदभ्रष्ट होण्याच्या वेळीं शिवभक्तांनीं त्यास साहाय्य केलें असें मागें सांगितलें आहे. ह्मणून जयसिंह राजापासून बिज्जल राजापर्यंत कल्याण शहर वीरशैवांच्या वैभवाचें अग्रस्थान होतें. त्यानंतर तेंच वैभव पुढें वृद्धी पावून चन्नबसवादिकांच्या काळींही तसेंच होतें; परंतु जयसिंहाच्या पूर्वी कल्याण शहरीं कोणी वीरशैव होता किंवा नाहीं या विषयीं व असल्यास कोणत्या स्थितींत होता याविषयीं विचार करून पाहूं. शके ९४० पासून ११६० पर्यंत व त्यापुढेंही वीरशैवांचें वर्चस्व उत्तरेस कल्याण शहरीं होतें असें ह्मटलें तर त्याविषयीं शके ९४० पासून ११६० पर्यंतच्या काळांतही ते तेथें प्रबल होते असें कांहीं ठिकाणीं आणखी प्रमाणें आडळतात. (See Asiatic Society Bombay-branch Vol IX No. XXVII Canarise Inscription No. 5 page 296) एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेच्या ९ व्या पुस्तकांत २७ व्या

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रिपोर्टांच्या कानडी शिलालेखांत बिज्जल राजानें पदच्युत केलेला तैलप्पाचा बाप तिसरा सोमेश्वर ह्मणून जो चालुक्य राजा होता त्यानें शके १०४९ पासून १०६० पर्यंत राज्य केलें. ह्यानें इनाम दिलेल्या कांहीं जमीनी ह्या शासनांत आहेत इतकेंच नव्हे परंतु गुलहळ्ळी गांवाचा भावय्या नांवाचा पाटील मंत्री होता. त्यानें हेम्मेश्वर देवाचें देवालय व त्याचे दक्षिण भागीं एक मठ बांधिल्याचें दिसून येत आहे. तें वाचलें असतां तो लिंगवंत होता असें समजतें परंतु जयसिंहाच्या काळीं तेथें लिंगायतांचें वर्चस्व होतें. तसेंच बिज्जलाच्या वेळीं बसवेश्वर मंत्री होता व मध्यें भावय्या मंत्री होता या विषयीं विचार करून पाहिलें तर जयसिंहापासून चन्नबसवादिपर्यंत निसंःशय कल्याण शहरीं लिंगायतांचें प्राबल्य होतें असें झालें. जयसिंहाचे मागून ह्मणजे शके ९४० नंतर कल्याण शहरीं कानडी लिंगायत लोक नव्हते असें नाहीं कारण कल्याण शहराजवळ श्री अमृतनाथ नांवाचें एक लिंगदेवालय आहे. तेथें एक शिलालेख शके ७८२ वर्षाच्या जेष्ट महिन्यांत लिहिलेला आहे. त्यांत कल्याण शहरीं राज्य केलेल्या महाम्माणि राजाचे मंत्री बिगप्पय्या, नागण्णय्या, जगळय्या, महादेवय्या हे सिद्ध भस्मप्रिय होते असें त्या शासनांत लिहिलेलें आहे. (Vide Royal Asiatic Society Bombay Branch Vol IX No. XXVI Page 219)

(१) शकसंवत् ७८२ जेठ सुध ९ सुक्रे समाधिगताशेषपंचमहाशब्द महामंडलेश्वरादिपाद्दि रिपुदैत्यदलन-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दामोदर ....

(२) सरणागतवज्रपंजरीत्यादि समस्तराजावलिविराजमान महामंडलेश्वर श्रीमहम्माणिराजदेवः एतत्समस्तजात्याधितामस्व

(३) समृद्ध सममहामात्य श्री विगप्पय्यस्तथा महाप्रजनः श्री नागण्णस्तथा लेखसंधिविग्रहाक श्री वेकरय्यस्तथा महासंधिविग्राहक जगळय्यस्तथा भांडागारप्रथम समधिसेन महादेवय्यस्तथा प्रथम खम भाविलय्यादिप्रधान श्री करणाद्वाविहितकल्याण विजयराज्यवृद्धत्वश्री ....

(४) गुरुणाभाल्लराजगुरुश्रीविकल्ल सिद्धभस्म .... lost — काणापिवृयकमहासामंतश्रीता — lost वरा lost लैफरावकेनभूत्वाश्रीआम्रनाथदेवकुल —lost पाषाण lost प्रभाससुद्धारतथाउद्धान (उदन्या) महामंडलश्वर समाचित्त राजदेवस्य भवनं संपादितम्

ह्यांतील जगळय्य, विगपय्य, नागण्णय्य, महादेवय्य, वेकरय्य ह्या नांवांविषयीं विचार केला तर अंत्यस्थानीं असणाऱ्या अय्य ह्या प्रत्ययावरून ते थेट कर्नाटिक होते असें ह्मणतां येईल. महादेवय्य, वेकरय्य ह्या नांवांवरून ते शिवभक्त होते असें ह्मटलें पाहिजे. महादेव व श्रीवेकरेश्वर हीं नांवें परमेश्वराचीं आहेत. श्रीवेकरेश्वर नांवाचें महादेवाचें देवालय अद्याप प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणें सिद्धभस्म ह्मणून भस्माचे प्रकार वीरशैवांत आढळतात. ह्मणून जयसिंहाच्या मागें २०० वर्षांपूर्वीं राज्यकारभार चालविलेल्या महाम्माणी राजाच्या कालीं कल्याण

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शहरीं शिवभक्त होते असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

ह्याप्रमाणें कल्याण शहरीं दाक्षिणात्य वीरशैवांची अभिवृद्धि बसवेश्वराचे पूर्वीं पुष्कळ कालापासून चालत आली होती. ही अभिवृद्धि बसवेश्वराच्या कालीं परमावधीस पोंचली होती असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हेंच ह्या लेखाचें तात्पर्य आहे.

समाप्त.

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No. 3584

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

विक्रीस तयार.

श्रीमंत रावसाहेब मल्लप्पा वसप्पा वारद यांच्या वीरशैवलिंगिब्राह्मणधर्मग्रंथमालेंतील मराठी भाषांतरासह असलेल्या संस्कृत ग्रंथांची यादी.

१. वीरशैवसदाचारसंग्रह किंमत १२ आणे
२. सिद्धांतशिखामणि १ भाग किंमत १ रुपाया ८ आणे
३. सिद्धांतशिखामणि २ भाग किंमत १ रुपाया ८ आणे
४. बसवेश्वरपुराण व्यासोक्त भाग १-२ प्रत्येकीं किंमत १ रुपया ८ आणे
५. वीरशैवाचारप्रदीपिका किंमत २ रुपये
६. हरिहरतारतम्य किंमत ४ आणे
७. विशेषार्थप्रकाशिका किंमत ७ आणे
८. रामायणसारसंग्रह किंमत ६ आणे
९. उपयुक्त वेंचे किंमत ७ आणे
१०. विरक्तोत्पत्तिक्रियालक्षण (कानडी) किंमत ४ आणे
११. पारमेश्वरागम भाग १-२ प्रत्येकीं किंमत १ रुपया
१२. कैवल्यसार किंमत १० आणे
१३. प्रभुलिंगलीला भाग १ किंमत १ रुपया ८ आणे
१४. प्रभुलिंगलीला भाग २ किंमत १ रुपया ४ आणे
१५. प्रभुलिंगलीला भाग ३ किंमत १ रुपया
१६. पंचाचार्यपंचमोत्पत्तिप्रकरण किंमत ६ आणे
१७. वीरमाहेश्वरप्रकरण किंमत ८ आणे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

१८. दीक्षादिकथन किंमत १ आणा
१९. सूक्ष्मागम किंमत ९ आणे
२०. शिवाद्वैतमंजरी (कानडी) किंमत ६ आणे
२१. वीरशैवलिंगिब्राह्मणवंशावळिपट किंमत १ आणा
२२ व्यापारसाम्राज्य पूर्वार्ध किंमत १ रुपया
२३. शिवपर अभंग किंमत ७ आणे
२४. शिवोत्कर्षकीर्तनतरंगिणी भाग १-२ प्रत्येकीं किंमत
८ आणे. भाग ३ किंमत ४ आणे
२५. पादोदकविचार किंमत २ आणे
२६. वीरमाहेश्वराचारसंग्रह भाग १ किंमत १ रुपाया ८ आ.
" भाग २ किंमत २ रुपये
" भाग ३ किंमत १ रुपया १२ आ.
२७. मराठी सिद्धेश्वरचरित्र किंमत २ आणे
२८. वीरशैवदीक्षाविधि
वीरमाहेश्वरदीक्षाविधि किंमत १ आणा
२९. शिष्यवर्गसंप्रदायनिरूपण किंमत १ आणा
३०. शिवपुराणवायवीयसंहिता पूर्व व उत्तरभाग प्रत्येकीं
२ रुपये
३१. भारतसारसंग्रह किंमत ६ आणे
३२. वीरशैवखानेसुमारी किंमत १ आणा
३३. अनादिवीरशैवसारसंग्रह भाग १-२ प्रत्येकीं किंमत १
रुपया ८ आणे
३४. वीरशैवमतसंवर्धिनी किंमत २ आणे
३५. विरक्तोत्पत्तिक्रियालक्षण किंमत ११ आणे
३६. संक्षिप्तविवाहविधि किंमत २ आणे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

३७. वीरशैवलिंगिब्राह्मण दशकर्मपद्धति किंमत १ रुपया ४ आणे
३८. तात्पर्यसंग्रह किंमत २ आणे ६ पै
३९ गुरुशिष्यलक्षण किंमत ६ पै
४०. ब्राह्मणवर्णन किंमत ३ पै
४१. वीरशैवलिंगिब्राह्मणधर्मपर अभंग किंमत ६ पै
४२. शैववीरशैवभेदाचारनिरूपण (सूक्ष्मागम पटल ७) किंमत ९ पै
४३. सूक्ष्मतंत्र पांचव्या पटलांतील गुरुशिष्यलक्षण किंमत १ आणा
४४. सूक्ष्मतंत्र ६ व्या पटलांतील लिंगस्वरूपपूजाफलकथन किंमत १ आणा
४५. शिवचरित्र किंमत ७ आणे
४६. वीरशैवांच्या धर्मसमजुतीस सरकारांतून मान } किंमत ६ पै
४७. वीरशैवशिवपूजाविधि किंमत ८ आणे
४८. श्रीरुद्राद्विपंचक किंमत २ आणे
४९. स्तोत्रसंग्रह किंमत १० आणे
५०. बिल्वोपनिषत् किंमत १ आणा
५१. अमरकोश प्रथमकांड किंमत १ आणा ६ पै
५२. उपन्यासविद्या (कानडी) किंमत ६ आणे
५३. वेदांतसारवीरशैवचिंतामणि उत्तरखंड किंमत २ रु. ८ आणे

छापत असलेले ग्रंथः— १ विवेकचिंतामणि, २ शैवरत्नाकर, ३ दत्तपुत्रस्वीकारविधान.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ग्रंथ मिळण्याचीं ठिकाणें:-- वरील ग्रंथ रा. रा. चनबसप्पा वारद यांचे मुंबई, विजापूर, सोलापूर, कलबुर्गी, पूर्णा, येथील दुकांनीं व बार्शी येथें नरसिंगगिरजी मिलचे दुकांनीं विकत मिळतील.

आह्मीं छापलेल्या धर्मग्रंन्थांपैकीं कोणत्याही ग्रंथाची दुसरी आवृत्ति काढण्याची कोणाची मर्जी असल्यास त्यास आमची परवानगी आहे, कारण धर्मग्रंन्थांचा जितका प्रसार होईल तितका व्हावा अशी आमची इच्छा आहे.

प्रसिद्धिकर्ता

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No. 3584

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रा.
र्गो,
लचे

ाही
र्जी
रण
ावा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri